# बुद्धगया महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात येणार कधी?

लेखक: अतुल भोसेकर
(मो.९५४५२७७४१०)

दिनांक: २७डिसेंबर२०१८ ते १जानेवरी २०१९

वर्तमानपत्र: वृत्तरत्न सम्राट (सामान्य जणांचा बुलंद आवाज)



बुद्धगया (बोधगया) हे जगभरातील बौद्ध अथवा बुद्ध विचार मानणार्यांसाठी एक अतिशय पवित्र श्रद्धास्थळ आहे. याच ठिकाणी राजपुत्र सिद्धर्थाला अतिशय खडतर प्रयत्नांती ज्ञानप्राप्ती होऊन बुद्धत्व प्राप्त झाले होते. जगातील अंतिम सत्य हे चार आर्य सत्य असून आर्य अष्टांगिक मार्गाने मनुष्य निब्बाण पोहचू शकतो, हे त्यांनी प्रतिपादले.

बुद्धांच्या काळी बुद्धगयेचे नाव 'ऊरुवेला' होते व ते नेरंजना नदी किनारी वसले होते. आता या नदीचे नाव फाल्गु झाले आहे. साधारणतः इ.स. पूर्व २५० मध्ये सम्राट अशोकाने आपल्या राज्याभिषेकच्या ११व्या वर्षी येथे येऊन येथील 'बोधिवृक्षाला' वंदन केले होते. या जागेचे पावित्र्य ओळखून अशोकाने येथे १,००,०००सोन्याच्या मोहरा दान देऊन विहार बांधण्यास सुरवात केली. त्याचबरोबर येथील बोधिवृक्षाचे योग्य जतन व्हावे, यासाठी त्याच्या भोवती १०फुट उंच भिंत देखील बांधली. तथागत बुद्धानां ज्याठिकणी ध्यान करून बुद्धत्व प्राप्त झाले, त्या ठिकाणी शिल्पाकृतीने सजविलेले एक चकाकते वज्रासन बनविले. मुख्य विहारच्या जवळ पूर्वेकडे तथागत बुद्धानी चंक्रमण केलेल्या ठिकाणी सम्राट अशोकाने २२ कोरीव दगड ठेवले व प्रत्येकावर धम्मलिपिमध्ये 'अ' ते 'ट' ही अक्षरे कोरून ठेवली. अशोकाने केलेल्या या सर्व कामाचा उल्लेख त्याच्या ८व्या शिलालेख, सांची स्तूप क्र.१ च्या तोरणावर आणि भारहूत स्तूपच्या पट्टीवर पाहायला मिळतात.

१८६३ मध्ये सर अलेक्सझांडर कनींघम यांनी मेजर मिड यांना बुद्धगया येथे उत्खनन करण्यास संगितले. नंतर १८८० मध्ये, बंगालचे लेफ्ट गवर्नर सर एशली इडण यांनी बेग्लर यांना महाबोधी महाविहाराचे संवर्धन करण्यास सांगितले.

उत्खननामध्ये अनेक प्राचीन शिल्प, नाणी, स्तंभ, शिलालेख सापडले जे महाबोधी महाविहाराच्या इतिहासावर प्रकाश टाकू शकले. सिंहली भिक्खू बोधिरक्षित यांच्या शिलालेखांवरून कळते की या महाविहाराला सर्वात प्राचीन भेट सिंहली भिक्खू चुल्ल तिस्स यांनी इ.स.पूर्व १०० मध्ये दिली होती.

वज्रासनाच्या पायथ्याशी सापडलेली सोन्याची व चांदीच्या नाण्यांवरून लक्षात येते की इ.स.१४० मध्ये कनिष्काचा मुलगा राजा हुविष्का याने या महाविहाराचा जिर्णोद्धार केला. वज्रासनाच्या व तथागत बुद्धांच्या मूर्तीच्या पायाशी इंडो स्किथियन शिलालेख याची खात्री देते.

इ.स.३९९-४०९ दरम्यान फा हियान या चीनी बौद्ध भिक्खूने महाविहाराला दोनदा भेट दिल्याचा उल्लेख आहे. यात त्याने महाविहाराच्या परिसराचे तपशीलवार वर्णन केले आहे.

इ.स.४थ्या शतकाच्या पूर्वार्धात, श्रीलंकेचा राजा मेघवन याचा भाऊ बुद्धगयेला आला असता, त्याला राहण्यासाठी ठिकाण सापडले नाही. आपल्या भावाला सांगितल्यावर, मेघवन ने बुद्धगया येथे मुख्य महाविहाराच्या पूर्वेला एक महाबोधी विहार बांधले जेथे सर्वांना प्रवेश होता. या विहराच्या दारावर एक पितळी धातूपट्टी होती ज्यावर लिहिले होते, “प्रत्येकाला, कोणत्याही अटींशिवाय मदत करणे हे बुद्धांचे सर्वश्रेष्ठ विचार होय.” कालांतराने हे विहार एक महत्वाचे बौद्ध विद्यापीठ झाले ज्याचा शैक्षणिक स्तर नालंदा किंवा विक्रमशिला सारखा होता. हुयान त्सांग ने याचे वर्णन करताना म्हटले आहे की यात सहा मोठी विहारे, तीन मजली टेहळणी बुरूज व संपूर्ण विहाराला सुरक्षेसाठी चाळीस फूट उंच भिंत होती. आतमध्ये भ. बुद्धाची सोनं व चांदीची मूर्ती होती व ती रत्नजडित होती. त्याकाळी तेथे जवळपास १०००भिक्खुंचे वास्तव्य होते. याच विहारात जगप्रसिद्ध बौद्ध आचार्य बुद्धघोष यांनी श्रीलंकेला जाण्यापूर्वी “अठ्ठसालिनि” व “ज्ञानोदय”(जो आता नष्ट झालाय) लिहिला. चिं हून, हूआन चाऊ, धर्मपाल(माध्यमकाचतुःसटिका चे लेखक) आणि रत्नवज्रा हे काही प्रसिद्ध भिक्खू याच विहारात होऊन गेले. येथे उत्खनन करताना, कनिंघम यांना या विहराचा परिसर २००० फूट लांब व १००० फूट रुंद दिसला व त्याची भिंत ९ फूट जाड होती. हे महाबोधी विहार १३व्या शतकापर्यंत सुरू होते, नंतर ते लयाला गेले. आजही त्याचे उरले-सुरले अवशेष पाहायला मिळतात.

इ.स.६००च्या दरम्यान राजा शशांकने बोधिवृक्ष व महाविहारातील बुद्ध प्रतिमा तोडण्याचा आदेश दिला. त्याने बंगाल प्रांतातील अनेक बुद्धविहार आणि स्तूप तोडून टाकले होते. अतिशय शिताफीने कामरूपचा राजा भास्करवर्मन ने बुद्ध प्रतिमा आणि बोधिवृक्ष त्याच्या विश्वासू मंत्र्यांमार्फत वाचविले व साधारणतः इ.स.६२०मध्ये बोधीवृक्षाभोवती २४ फूट उंचीची भिंत बांधली.

इ.स.६३७मध्ये हुयान त्सांग ने महाबोधी महाविहाराला भेट दिली. त्याच्या लेखात आलेला प्रवेशद्वार व भव्य मंडप हा त्याकाळी ब्रम्हदेशाचा राजा साडो याने बांधला होता. हुयान त्सांगच्या भेटीच्या आधी येथील फाल्गु(नेरंजना) नदीला पूर आला होता व त्याचे पाणी व वाळू संपूर्ण महाविहार परिसरात पसरली होती. महाविहारात अक्षरशः अडीच फूट उंच वाळू साचली होती व त्यात वज्रासन देखील दाबले गेले होते.

हुयान त्सांगने वर्णन केल्याप्रमाणे महाबोधी महाविहार १७०फूट उंच होते व संपूर्ण बांधकाम प्लास्टर केलेल्या लाल रंगाच्या निळसर छटा असलेल्या विटांनी बनविले होते. महाविहाराच्या भिंतीवर अनेक ठिकाणी कोनाडे केले होते व त्यात सोन्याचा मुलामा असलेली बुद्धमूर्ती ठेवल्या होत्या. महाविहाराच्या पूर्वेला तीन मजली मंडप होता व त्याच्या आतील भिंतीवर सोन्याचांदीचे सजवलेली कलाकुसर होती. महाविहाराच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला अवलोकिटेश्वर आणि मैत्रयाच्या १०फूट उंच मूर्ती होत्या. बोधिवृक्षाच्या भोवती उंच भिंत होती.

बुद्धांच्या बुद्धगये येथील ७ आठवड्यांच्या वास्तव्यात त्यांनी प्रत्येक ठिकाणी ध्यानमग्नतेत व्यतीत केलेल्या ठिकाणी सम्राट अशोकाने सुंदर कोरीव स्मृतिस्थळ बांधल्या होत्या. या व्यतिरिक्त अशोकाने अनेक ठिकाणी स्तूप बांधले, ज्यात सुजाताने बुद्धाना ज्याठिकणी खीर दिली, कश्यप बंधुनी बुद्ध धम्माची दीक्षा घेतली व मातीपोसक जातकाचे ठिकाण सामील होते.

हे सर्व स्तूप १८व्या शतकापर्यंत अस्तित्वात होते. नंतर महंतांच्या अलिखित सूचनेनुसार (हे सविस्तर नंतर येणार आहे), तेथील गावकऱ्यांना हे स्तूप पोखरून तेथील विटा काढून आपली घरे बांधण्यास सुरुवात केली. कनिंघम ला नंतर उत्खनन करताना लाखेच्या अनेक मूर्ती सापडल्या.

महाबोधी महाविहाराचे संवर्धनाचे काम अनेक राजांनी आणि असंख्य अनामिक दानदात्यांनी केले. त्याकाळी महाविहाराभोवती जे नक्षीदार कुंपण अशोकाने बांधले होते, त्यावर अनेकांनी शिलालेख कोरून ठेवले. एका शिलालेखात एका दानदात्याने २५०दिनार (

गुप्तकालीन सोन्याचे नाणे) दान दिले. त्याचबरोबर महाविहार रोज दीप पूजनाच्या तुपासाठी ३००गाय महाविहाराला दान दिल्याचे दिसते.

७व्या शतकाच्या सुमारास इत्सिंगने महाबोधी महावीहारास भेट दिल्याचे कळते. त्याने वर्णन केल्याप्रमाणे अनेक व्यापारी आणि राजांनी महाबोधी महाविहाराच्या स्वंरक्षण आणि संवर्धनासाठी अनेक गावे दान दिले होती. १०व्या शतकाच्या पूर्वार्धापासून महाबोधी महाविहाराला श्रीलंका, चीन आणि तिबेट वरुन अनेक बौद्ध भिक्खू भेट देण्यासाठी येऊ लागले. इ.स.९६४मध्ये ३०० पेक्षा जास्त भिक्खू चीनमधून महाबोधी महाविहारास भेट देण्यासाठी आले होते. चीन सम्राट ताई त्सुंग(इ.स. ९७६-९९७) ने बोधिवृक्षाखाली स्तूप बांधण्यासाठी दान दिले होते.

महाबोधी महाविहाराच्या उत्तरेकडील सज्जाकडे जाणाऱ्या जिन्याकडच्या वरच्या बाजूस तथागत बुद्धाची एक भव्य मूर्ती कोरण्यात आली आहे. तिच्या दोन्ही बाजूला अवलोकितेश्वर आणि मैत्रेयीच्या मूर्ती आहेत. तेथील शिलालेख वरुण कळते की ही मूर्ती भिक्खू विरेंद्रने १०व्या शतकात दान दिली होती. इ.स.१०३५ते१०७९ दरम्यान, ब्रम्हदेशाच्या राजाने महाबोधी महाविहाराच्या दुरुस्तीसाठी प्रचंड दान दिले होते.

चिनी भाषेतील सर्वात प्राचीन शिलालेख येथील एका दगडावर सापडला ज्यावर तथागत बुद्धांच्या सात मूर्ति कोरल्या आहेत. सध्या हा दगड इंडियन म्युझियम, कोलकता येथे पाहायला मिळतो. इ.स.१०११मध्ये दिपंकर श्रीजना(ज्यांना प्रामुख्याने अतिसा या नावाने ओळखले जाते) यांची दीक्षा येथेच झाली. येथील महाविहारात 2वर्षे राहून त्यांनी बौद्ध आचार्य सिलरक्षिता यांच्याकडून विनय शिकून घेतला.

११व्या शतकाच्या पूर्वार्धात महाबोधी महाविहाराला पुन्हा डागडुजीची गरज भासली. त्यावेळेस ब्रम्हदेशाचे राजे किंझिट्ठा(इ.स.१०८४-१११३) यांनी जहाज भरून सोने, चांदी मौल्यवान जडजवाहीर बुद्धगयेत पाठवून दिले. ११व्या शतकातील एका शिलालेखाद्वारा ही माहिती मिळते.

इ.स.१२३०मध्ये, शिवलिकचा राजा अशोकवल्ला याने त्याचे गुरु पंडित मुशाला आणि चट्टोपादी यांच्या सांगण्या वरून येथे एक विहार बांधले. त्याच दरम्यान कामराज चा राजा पुरुषोत्तमसिंह याने आपल्या नातवाच्या स्मृतिप्रीत्यर्थ एक विहार बुद्धगयेत बांधले. बांधकामाच्या देखरेखेसाठी राजाने भिक्खू धर्मरक्षित यांची नेमणूक केली होती. सर कर्निंघम यांना सापडलेल्या एका शिलालेखात ही माहिती मिळते.

एका सर्वसाधारण समजूत अशी आहे की इ.स.११९९ मध्ये बुद्धगयेचे महाबोधी महाविहार व आजूबाजूची विहार आणि संघरामे हे मुस्लिम आक्रमणामुळे नष्ट झाले, मात्र असा कुठेही ठोस पुरावा सापडत नाही. उलट इ.स.१२३४ मध्ये तिबेटी भिक्खू धर्मस्वामीन बुद्धगयेच्या भेटीवर आले असता त्यांना येथील महाबोधी विहरांमध्ये ३०० सिंहली भिक्खू अध्ययन करताना दिसले. त्याकाळातील मुस्लिम आक्रमणामुळे महाबोधी महाविहाराला थोड्या प्रमाणात तोडफोड आणि चोरी यांना तोंड द्यावे लागले, मात्र यामुळे भिक्खुंच्या अभ्यासात कुठे बाधा निर्माण झाली नाही.

इ.स.१२६२मधील एका शिलालेखानुसार, श्रीलंकेचा राजा जयसेन आणि त्याचे वडील बुद्धसेना यांनी महाबोधी महाविहाराच्या दुरुस्तुसाठी दान दिल्याचे कळते, तर इ.स.१२९८मध्ये ब्रम्हदेशाचा राजा धम्मचेतिया यांनी महाबोधी महाविहाराच्या दुरुस्तीसाठी दान दिले.

शिलालेखानुसार १६व्या शतकात येथील महाबोधी महाविहाराला बुद्धगुप्त या भिक्खुने भेट दिली. भेट देणारे ते शेवटचे भारतीय भिक्खू होते. त्याच दरम्यान सिंहली भिक्खू धर्मादिवाकर यांनी देखील महाबोधी महाविहाराला भेट दिली.

बुद्धगयेतील महाबोधी महाविहाराला भेट देणे जगातील बौद्ध राष्ट्रातील सर्वच लोकांना जमणारे नव्हते. साधनांची कमतरता, प्रतिकूल प्रवास आणि त्याच बरोबर भारतातील मुस्लिम राज्य व त्यामुळे उद्धवलेली युद्धयजन्य परिस्थिती या मुळे बुद्धगया येथे येणाऱ्या लोकांचा ओढा कमी झाला. यावर मात करण्यासाठी अनेक बौद्ध देशातील राजांनी बुद्धगया येथील महाबोधी महाविहाराची प्रतिकृती करण्यास सुरुवात केली.

ब्रम्हदेशाचे राजे किंझिठ्ठा यांनी काही खास कारागार बुद्धगयेला पाठवून महाबोधी महाविहाराचे आराखडे तैय्यार केले व पगाण या ठिकाणी महाबोधीची प्रतिकृती तयार केली.

इ.स.१४५२साली तिबेट मध्ये महाविहाराच्या आकाराचे स्तूप बनविण्यात आले व त्यात लामांच्या अस्थी ठेवण्यात आल्या. इ.स.१४७२ मध्ये पेगुचा राजा धम्मचेतीयाने कारागीर पाठवून महाबोधीच्या संपूर्ण रचनेचा आराखडा तयार केला व अतिशय सुंदर आणि भव्य असे महाविहार(स्थानिक भाषेत शेवगुगयी) बांधले.

इ.स.१४४८ मध्ये थायलंडचे राजे तिलोकराजा याने महाबोधी महावीराच्या धर्तीवर महाबोधरामा, वाट-जेट-योट नावाचे महाविहार बांधले. त्यांनी खास श्रीलंकेवरुन बोधिवृक्षाच्या झाडाचे रोपटे आणून बांधलेल्या महाविहाराच्या संपूर्ण परिसराची(भ. बुद्धांचे सात महत्वाच्या ठिकाणांसहित) मूळ आकाराची प्रतिकृती बनवली. पुढे १६व्या ते १८व्या शतकाच्या दरम्यान चियांग राई या भागात महाबोधी महाविहाराच्या आकाराचे विहार बनविण्यात आले.

१६व्या शतकात नेपाळवरून एका उपासकाने बुद्धगयेला येऊन महाबोधी महाविहाराचा नकाशा बनविला आणि नेपाळ मधील पाटण येथे महाविहार साकार केले. १९३४ च्या भूकंपामध्ये ते उध्वस्त झाल्यानंतर तेथे पुन्हा ते उभारण्यात आले.

१७४८ साली चीनमध्ये पहिल्यांदा महाबोधी महाविहाराच्या आकाराचा विहार उ ता झू पेकिंग शहराच्या लगत बनविण्यात आला. या दरम्यान बदलेल्या परिस्थिती मुळे, बुद्धगयेकडे परदेशी भिक्खू आणि उपासकांचा ओघ कमी झाला. महाबोधी विहार (संघाराम) तर ओस पडले होते व महाबोधी महाविहारात अगदी थोडे भिक्खू शिल्लक राहिले. कालांतराने तेही निघून गेले.

१७व्या शतकाच्या पूर्वार्धात शैव पंथाचा गोसावी घमंड गिरी हा बुद्धगया येथे येऊन राहिला. हळूहळू त्याचा शिष्यवर्ग वाढायला लागला. स्वतःला महंत म्हणून घेणाऱ्या या घमंड गिरीने महाबोधी महाविहारा जवळ व महाबोधी संघरामाच्या परिसरात आपला आश्रम स्थापन केला. महाबोधी महाविहारातील काही बुद्धमूर्ति त्याने आणून आपल्या आश्रमात ठेवल्या आणि देव-देवतांच्या मूर्ती म्हणून पूजा अर्चना सुरू केली.

महाबोधी महाविहाराच्या परिसरातील मूर्तींची दैवतीकरणाला सुरुवात झाली.

महंत आता खूप ताकतवर आणि श्रीमंत होऊ लागला होता. महाबोधी महाविहार हे स्वतःच्या मालकीचे आहे अशा थाटात वागू लागला. देखभाल विना महाबोधी महाविहाराची रया जाऊ लागली. महाविहारातील अनेक बुद्ध आणि बोधिसत्वांच्या प्रतिमेचे पूजन हिंदू देवदेवता म्हणून व्हायला लागले. १७९० मध्ये अनेक ब्रिटीश चित्रकार, प्रवासी, सर्वे करणारे आर्किटेक, पुरातत्व शास्त्रज्ञ बुद्धगयेला भेटी देऊ लागले. यामध्ये जगप्रसिद्ध चित्रकार विलियम आणि थॉमस डॅनियल हे होते ज्यांनी महाबोधी महाविहाराचे त्यावेळेसची चित्रे काढून ठेवली आहेत.

१८११मध्ये ब्रिटिश सरकारने फ्रान्सिस यांनी त्यावेळेसच्या बुद्धगयेचे तपशीलवार वर्णन केले, मात्र तेहुयान त्सांग ने इ.स.६३२ मध्ये केल्याप्रमाणे नव्हते. महाबोधी महाविहारातील सोने, चांदी, हीरे, सुंदर कोरीव मूर्ती व वेलबुट्टी, आतील कोरीव लाकूडकाम यापैकी काहीही दिसले नाही. बुकानान यांना महाविहाराचे कोसळलेले मजले, महंताने व इतर लोकांनी अनेक स्तूपांना खोदून त्यांच्या विटांनी आश्रम आणि घरे बांधल्याचे दिसले. महंताने महाविहाराच्या भोवतालचे कोरीव स्तंभ काढून शेजारीच पांचपांडव नावाचे मंदिर बांधले होते. वज्रासनाशेजारी ठेवलेला दगड ज्यावर बुद्धांचे पदचिन्ह साकारले होते, तो दगड महंतांच्या मंदिरात विष्णुपद म्हणून ठेवल्याचे दिसले. ब्रिटिश सैन्यातील जेम्स चिचली व जेम्स क्रोकेट यांनी महाविहाराचे छायाचित्र काढून ठेवले होते.

१८४७मध्ये कॅप्टन मारखम किटो यांनी सर्वात पहिल्यांदा येथे उत्खनन केले. सम्राट अशोकाने बसविलेल्या काही कुंपणपट्टी व अनेक शिल्प येथे सापडले. त्यातील अनेक भारतातील विविध संग्रहालयात पाठवून देण्यात आहे.

१८६१मध्ये सर अलेक्झांडर कंनिंघम यांच्या सूचनेनुसार मेजर मीड यांनी उत्खनन केले. मुख्य महाविहारात संपूर्ण डबर साचले होते व पावसाळयात सगळीकडे पाणी साचले होते.

१८७६साली सर रिचर्ड टेम्पेल यांनी अनेक बुद्धमूर्ती बुद्धगयेच्या परिसरात विखुरलेल्या दिसल्या. १८८६ मध्ये सर

एडविन अर्नोल्ड (द लाईट ऑफ एशिया चे लेखक) यांना बुद्धगयेची स्थिती पाहून धक्काच बसला आणि श्रीलंकेत गेल्यानंतर त्यांनी तेथील बौद्धांना हे महाविहार पुनश्च नूतनीकरण करावे असे सुचविले.

१८९१ मध्ये श्रीलंकेतील एक तरुण बौद्ध नागरिक धम्मपाल व त्याचा मित्र, जपानी बौद्ध भिक्खू कोझेन गुणरत्न हे गयावरून बुद्धगयेला येत असताना त्यांना वाटेत अनेक तोडलेल्या बुद्ध प्रतिमा दिसल्या. बुद्धगयेतील स्थिती तर आणखीन दयनीय झाली होती. धम्मपालांना महाबोधी महाविहाराच्या अनेक कोरीव प्रतिमा या गावातील भिंतीवर अथवा विहिरीवर प्लास्टर केलेल्या दिसल्या. काही बुद्धमूर्ती विहिरीतील पाणी काढण्यासाठीच्या दोरीला वजन म्हणून वापरताना दिसल्या. महाविहाराचे अनेक नक्षीदार, कोरीव दगड हे महंतांच्या व त्यांच्या शिष्यांच्या घराच्या अंगणात वपरल्या होत्या. महंतांच्या बारादरी मध्ये ३फूट उंचीची बुद्धमूर्ती जमिनीत अर्धवट गाडलेल्या अवस्थेत होती. धम्मपालने तेथून वज्रासनाला वंदन करून महाविहराला पुनर्जीवित करण्याचे ठरविले.

त्यानंतर अनेकवेळा धम्मपाल महाविहारात जाऊ लागले. त्यांच्या जपानी मित्राने पाठवविलेली एक ७०० वर्षे जुनी असलेली बुद्धमूर्ती तेथे ठेवत असताना, महंतांच्या शिष्यांनी त्यांना विरोध केला. एकाने ती बुद्धमूर्ती काढून खाली फेकली. या मंडळींनी धम्मपालांना हुसकावून लावले. नंतर धम्मपलांना ती बुद्धमूर्ती महंतांच्या पांचपांडव मंदिरात भिंतीला लावून ठेवलेली दिसली. त्याच दिवशी नागरिक धम्मपालांनी महंताविरोधात पहिली तक्रार पोलीस ठाण्यात नोंदवली. एका संघर्षाला सुरुवात झाली होती.

१८९१ ते १८९३ या काळात अनागरिक धम्मपाल यांनी सात वेळा महाबोधी महाविहाराला भेट दिली. याच काळात ते बुद्धधम्मावरील व्याख्यानासाठी आणि महाबोधी महाविहाराच्या प्रसारासाठी त्यांची जगभ्रमंती देखील चालू होती. त्यांनी अनेक वेळा महंत गिरी यांना विनवणी केली की महाबोधी परिसर त्यांनी सोडून जावा. ही बौद्धांची जागा असून तेथे शैव पंथाचे काहीच नाही व त्यांनी या जागेवर अतिक्रमण केले आहे. एवढेच नव्हे तर त्यांनी महंतला जागा सोडून जाण्यासाठी हवी ती किंमत देखील देऊ केली. मात्र महंताने त्यांच्या विनंतीकडे दुर्लक्ष केले आणि त्यांना सक्त ताकीद दिली कि त्यांनी फक्त महाविहारातील बुद्धमूर्तीची पूजा करावी व इतर गोष्टींकडे लक्ष देऊ नये. महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात घेण्यासाठी एखाद्या ट्रस्ट मार्फत प्रयत्न करावे लागतील हे ओळखून अनागरिक धम्मपलांनी कर्नल ऑलकॉट यांच्या बरोबर श्रीलंके मध्ये ३१ मे १८९१ 'द महाबोधी सोसायटी' स्थापन केली. त्याचा मुख्य उद्देश होता बुद्धगया येथील महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात येण्यासाठी कायदेशीर मार्गाने लढा देणे.

जेव्हा बंगालचे लेफ्ट. गव्हर्नर जनरल सर अँशली इडन बुद्धगयाच्या भेटीला आले, तेव्हा महंताने त्यांना भेटून महाबोधी महाविहार हे हिंदू मंदिर असल्याचा दावा केला. इडन यांच्या भेटीच्या वेळेस महंताने मुद्दामहून बोधीवृक्ष जवळ त्याच्या आश्रमातील ३० - ४० लोकांना पिंडदान करण्यास सांगितले. मात्र अँशली इडन यांना या महाविहाराची पूर्वीपासूनच कल्पना होती व त्यांनी या गोष्टीकडे दुर्लक्ष केले. या साऱ्या घडामोडींवर सर चार्ल्स इलियट यांनी महाबोधी सोसायटीच्या जानेवारी १८९५ च्या अंकात सविस्तर लिहिले आहे.

जेव्हा काही बौद्ध भिक्खू आणि श्रामणेरांनी बोधीवृक्षाखाली संध्याकाळची प्रार्थना म्हणण्यास सुरुवात केली (जी त्यांची नेहमीची प्रथा होती) तेव्हा महंतांच्या लोकांनी त्यांना हूसकावून लावले. जेव्हा हे सगळे बर्मा गेस्ट हाऊस मध्ये परतले, तेव्हा महंतांच्या लोकांनी काही वेळानी तेथे जाऊन त्यांना लाठ्या काठ्यांनी मारले. अनेक जण रक्तबंबाळ झाले. एका भिक्खुची तर अत्यंत नाजूक परिस्थिती झाली होती व त्याला गया येथील सरकारी दवाखान्यात अॅडमिट करावे लागले. पोलिसांच्या नोंदणीनुसार बर्मा गेस्ट हाऊसच्या लाद्या रक्ताने माखल्या होत्या.

अनागरिक धम्मपालानी याविषयी जगातील अनेक वर्तमानपत्रात लिहिले व संपूर्ण जगाचे लक्ष याकडे नोंदविले. महाबोधी सोसायटी मार्फत त्यांनी पोलिसांकडे तक्रार केली. मात्र एक दोघांवर कारवाइशिवाय काही विशेष झाले नाही.

तरीदेखील धम्मपाल महाबोधी महाविहारात जात राहिले व सकाळ संध्याकाळ तेथे वंदना घेऊ लागले. २५ फेब्रुवारी १८९५ रोजी धम्मपालांवर महंतांची लोके धावून गेली. धम्मपलांना मारहाण करण्यात आली व त्यांना बुद्धगयेतून निघुन जाण्यास सांगण्यात आले. चार वर्षे वाट पाहूनही व सामंजस्याने बोलणी करून देखील महंत ऐकत नव्हता, उलट बौद्ध भिक्खुंच्या अंगावर धावून जात होता, हे पाहुन धम्मपालांनी गया येथील जिल्हाधिकारी डी. जे. मॅकफेरसन यांच्याकडे कायद्यानुसार केस दाखल केली व त्या सुनावणीची जिल्हाधिकाऱ्यानी ८ एप्रिल १८९५ रोजी सुरुवात केली. त्यावेळी अनागरिक

धम्मपाल फक्त २९ वर्षाचे होते.

अनागरिक धम्मपालांनी शपथेवर सांगितले कि (एके दिवशी त्यांना दिसले कि महाबोधी महाविहारातील बुद्धमूर्तीला एका भगव्या कपड्यात गुंडाळले होते व कपाळाला लाल रंगाने माखले होते. डोक्यावर फुले ठेवण्यात आली होती. एवढेच नव्हे तर महंताने तेथे एका पुजारीची नेमणूक केली होती आणि तो सकाळ संध्याकाळ बुद्धमूर्ती समोर आरती करीत असे. हे सगळे बुद्धधम्माच्या विचाराच्या विरोधात होते.

त्यांना त्याचे अतिव दुःख झाले होते. आणि म्हणूनच या सगळयाचा सोक्षमोक्ष लावायचे ठरवून त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांसमोर पिटिशन दाखल केले होते. अनागरिक धम्मपालांनी टाकलेली कोर्ट केस ८ एप्रिल १८९५ रोजी सुनावणीला आली. ही केस बरीच चालली व अनेक लोकांच्या साक्ष नोंदविण्यात आल्या. काही प्रमुख साक्षीदार आणि त्यांची साक्ष अशी:

बिपीन बिहारी बॅनर्जी, महाबोधी महाविहाराचे मुख्य सरक्षक - या महाविहारात कोणी हिंदू पूजा करीत नाही. मी ही शक्यतो महाविहारात जात नाही, कारण मी हिंदू आहे आणि माझा धर्म मला तसे करण्यास मनाई करतो. मी बुद्धांची मूर्ती खाली ठेवलेली पहिली आहे. नुकतेच सुट्टीरून आल्यानंतर मी बुद्धांच्या मूर्तीला भगवे कापड गुंडाळलेले पहिले तसेच मूर्तीच्या कपाळावर लाल रंग लावण्यात आला होता व तेथे एक ब्राह्मण पुजारी पूजा करताना दिसला. यापूर्वी कधीही कोणीही ब्राह्मण येथे पूजा करायला येत नसे.

महातली सुमंगला, सिंहली बौद्ध भिक्खू - धम्मपालांबरोबर त्यादिवशी महाविहारात होतो, जेव्हा महंतांच्या लोकांनी बुद्धमूर्ती काढून घेतली. त्यावेळेस आम्ही कुठलाही प्रतिकार केला नाही, मात्र ही जपानवरून आलेली मूर्ती असून तिचा सन्मान करणे योग्य आहे असे म्हटने. त्यावेळेस काही लोकं धम्मपालांवर धावून गेली.

डॉ. हरी दास चॅटर्जी, गया मधील डॉक्टर - १८७३ मध्ये मी पहिल्यांदा महाबोधी महाविहार पाहिले. नंतर त्याची डागडुजी झाल्यानंतर देखील पाहिले. मी तेथे केवळ बौद्ध लोक व भिक्खू येताना पाहिले आहेत. ते तेथे मेणबत्ती व धूप जाळतात. तेथे कोणी हिंदू कधीच जात नाही.

बाबू दुर्गा शंकर भट्टाचार्य, जमीनदार - मी बुद्धगया येथील महाबोधी महाविहार अनेकवेळा पाहिले आहे. तेथे बुद्धमूर्ती जवळ अनेक बौद्ध कपडे, पैसे दान देताना पाहिले आहे. सध्याच्या महंताने बर्माच्या राजाने महाबोधी महाविहाराला दान दिलेले अनेक सोन्या चांदीच्या वस्तु स्वतःजवळ ठेवल्या आहेत हे मला महंताच्या एका शिष्यानेच सांगितले व जेथे ठेवल्या ती खोली देखील दाखवली आहे.

पंडित गंगाधर शास्त्री, मुख्याध्यापक जिल्हा शाळा, गया - महाबोधी महाविहार हे बौद्धांचे स्थान आहे, हिंदूंचे नव्हे. मी हे महाविहार फक्त बाहेरून पहिले आहे कारण माझे धर्मशास्त्र मला तेथे जायला परवानगी देत नाही. तेथे गेलो तर मला प्रायश्चित घ्यावे लागेल.

आपल्या १०२ पानांच्या निकालपत्रात डी. जे. मॅकफेरसन यांनी जयपाल गिरी, महेंद्र गिरी, बिमल देव गिरी आणि आणखीन दोघे जणांना आयपीसी च्या कलम २९५, २९६ आणि २९७ अन्वये दोषी धरत प्रत्येकाला १ महिना साधी कारावास व रुपये १०० दंड दिला. हा खटला खूप गाजला. न्यायालयातील साक्षी दरम्यान झालेल्या प्रश्न उत्तरावरून एक अधोरेखित झाले कि बुद्धगया येथील महाबोधी महाविहार हे बौद्धांचेच असून तेथे हिंदू महंताने अनधिकृत कबजा मिळवला आहे.

महंताने गया कोर्टाविच्याविरुद्ध कलकत्ता उच्च न्यायालयात अपील केले जेथे ही शिक्षा रद्द करण्यात आली. अनागरिक धम्मपालांना मोठा मनस्ताप झाला.

जेव्हा लॉर्ड कर्झन व्हाईसरॉय झाले तेव्हा त्यांना बर्मी लोकांच्या शिष्ट मंडळाने बोधिवृक्ष आणि महाबोधी महाविहार महंताच्या ताब्यातून सोडवून बौद्धांकडे सोपविण्याची विनंती केली. या प्रकरणात कर्झन यांनी लक्ष घालून, १९०३ मध्ये बुद्धगया येथे आले. यावेळेस महंत त्यांना भेटण्यास आला. कर्झन यांनी त्याला विचारले की तो हिंदू असूनही बुद्धविहारावर कब्जा का केला आहे, काय तो बुद्धांची पूजा करतो आहे? महंत म्हणाला की बुद्धांना तो विष्णुचा अवतार मानतो. यावर कर्झन म्हणाले, तू तर शैव पंथीय आहेस, वैष्णव नाहीस, यावर महंत निरुत्तर झाला. कर्झन यांची खात्री पटली की महंतला केवळ महाबोधी महाविहारावर ताबा मिळवायचा आहे. मात्र यात जास्त घाई करूनही चालणार नव्हते हे कर्झन ओळखून होते.

अनागरिक धम्मपाल यांनी पुरोगामी हिंदुची मने वळविण्यास सुरू केले. १९२२ रोजी गया येथे भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेसच्या अधिवेशनात महाबोधी सोसायटी तर्फे महाविहाराच्या संपूर्ण माहितीची पुस्तिका वाटली व महाविहाराच्या ताब्यासंबंधी मागणी केली. बर्मी शिष्टमंडळाने देखील आग्रहाची मागणी केली (बर्मा देश त्यावेळेस भारताचा भाग होता). अधिवेशनात ठराव मंजूर झाला आणि एक समिती स्थापन करण्यात आली. तिचे प्रमुख राजेंद्र प्रसाद यांना नेमण्यात आले. आणखी एक सदस्य होते ज्यांचे नाव स्वामी रामोदार दास होते. त्यांनी नंतर बुद्धधम्म स्वीकारला व राहुल सांकृत्यायन म्हणून पुढे प्रसिद्ध झाले.

१९२५ साली समितीने अखिल भारतीय कॉंग्रेस आणि हिंदू महासभा यांनी एकत्रित येऊन हा प्रश्न सोडवावा असे ठरले. त्यानुसार हिंदू महासभेच्या ४००० सदस्यांपुढे धम्मपाल यांनी आपली भूमिका मांडली. या परिषदेत एक ठराव पारित करण्यात आला, तो म्हणजे महाबोधी महाविहारात पूजेचा संपूर्ण हक्क बौद्धांना देण्यात यावा व महाविहार समितीमध्ये त्यांचा सहभाग असावा. बर्मी सदस्य उ टोक क्यि यांनी एक बिल मांडून भारत, श्रीलंका आणि बर्मा येथील बौद्धांना या समितीत स्थान असावे असे सुचविले. महंताने या सर्वाला नकार दर्शविला व महाबोधी महाविहाराचा ताबा देण्यास नकार दिला.

अनेक दशकांची धावपळ, वार्धक्य, खालावलेली तब्येत आणि महाबोधी महाविहारप्रकरणी निघत नसलेला तोडगा, यामुळे अनागरिक धम्मपाल खचले होते. त्यांनी या लढ्यातून माघार घेत, सर्व सूत्र आपले सचिव व मित्र देवप्रिय वालीसिंह यांच्याकडे सुपूर्द केली. १९३४ साली धम्मपाल यांचे निर्वाण झाले. ४२ वर्षे जो एकहाती लढा त्यांनी दिला व जगाचे लक्ष याकडे वेधले तो अनोखा लढा होय. महाबोधी महाविहाराचे संपूर्ण अधिकार बौद्धांकडे असावे ही त्यांची मागणी अपूर्णच राहिली.

अनागरिक धम्मपालांच्या निर्वाणानंतर, त्यांनी स्थापन केलेल्या महाबोधी सोसायटीच्या कार्यकर्त्यांनी, भारतातील व इतर बौद्ध राष्ट्रातील बौद्धांच्या मदतीने महाबोधी महाविहाराचा प्रश्न सतत उपस्थित केला. त्यांनी भारतातील अनेक हिंदू मित्र जोडले होते ज्यांना महाबोधी महाविहाराच्या प्रश्नावर सकारात्मक निकाल हवा होता. १९३५ साली हिंदू महासभेने कानपुर मध्ये अधिवेशन भरविले होते. बर्माचे विद्वान भिक्खू उ ओट्टाम हे या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. या अधिवेशनाला भारत, श्रीलंका व बर्मा वरून अनेक बौद्ध उपस्थित राहिले होते. बौद्धांना महाविहारात पूजे बरोबरच समितीमध्ये देखील अधिकार हवा या मागणीला या अधिवेशनात पाठिंबा मिळाला मात्र हा ठराव संमत करताना उपस्थित अनेकहिंदू स्वामींनी त्याला विरोध दर्शवित मंचाकडे धाव घेतली. राजेंद्र प्रसाद यांना मदत करण्यासाठी येथे आणखी एक समिती तयार करण्यात आली होती.

६ मार्च १९३७ मध्ये राजेंद्र प्रसाद यांनी अखिल भारतीय कॉंग्रेससमोर महाबोधी महाविहार संबंधीचे बील मांडले व येणाऱ्या काळात नवीन मंत्र्यांनी ते लगेच अमलात आणावे, असा आग्रह धरला. जगातील बौद्ध राष्ट्रातील प्रमुख अत्यंत मुत्सदीपणे महाविहाराचे प्रश्न आंतरराष्ट्रीय मंचावर मांडून भारतावर दडपण आणत होते.

स्वातंत्र्योत्तर लगेच्च महाबोधी सोसायटीने पाटणा मध्ये बौद्ध व हिंदूची एकत्रित बैठक बोलावली. महंताला महाविहाराचा हक द्यायचा नव्हता. खरं तर हिंदू महासभेच्या शब्दाबाहेर महंत नव्हता किंवा तो सगळयांविरुद्ध जाऊच शकला नसता मात्र तरीही त्याने विरोध कायम केवला, या बैठकीत सगळा विचार करून महाबोधी महाविहारावर बौद्ध हिंदू यांची एक समिती बनवून त्यांचा संयुक्त हक्क राहील असे ठरवले गेले. याच दरम्यान आंतरराष्ट्रीय आशिया संमेलनात देखील बौद्ध राष्ट्रातील चीन, तिबेट, बर्मा आणि श्रीलंका येथील प्रतिनिधी यांनी प्रधानमंत्री नेहरूंना यात लक्ष घालून लवकरात लवकर महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्यावे असा आग्रह धरला. नेहरूंना देखील हा प्रश्न मिटवून शेजारील राष्ट्रात भारताबद्दल आदर वाढवायचा होता.

अनेक वर्षांच्या संघर्षानंतर १९४८ साली, बोधगया महाविहार अधिनियम याचा मसुदा जनतेच्या सूचनांकरिता प्रसारित करण्यात आला. या अधिनियमानुसार समितीमध्ये ४ बौद्ध व ४ हिंदू असतील व समितीचा अध्यक्ष म्हणून गया जिल्ह्याचे जिल्हाधिकारी असतील असे नमूद करण्यात आले. हा अधिनियम वाचून बौद्धांची घोर निराशा झाली कारण या समितीमध्ये सर्वात जास्त मेंबर्स हे हिंदू असणार होते. मुख्य म्हणजे हे महाबोधी महाविहार बौद्धांचे असताना देखील हिंदू त्या समितीवर असणार याचा मनस्ताप बौद्धांना झाला. तरी देखील बौद्धांना या समितीत समाविष्ट करता येणार होते म्हणून हा अधिनियम १९ जून १९४९ मध्ये पारित करण्यात आला. याला पुढे “बोधगया मंदिर अधिनियम १९४९” असे संबोधण्यात आले.

२८ मे १९५३ साली, वैशाख पौर्णिमेला महंताने आपले सारे हक्क समितीकडे एका जाहीर कार्यक्रमात सुपूर्द केले.

बौध्दगयाच्या परिसरातील उत्खनन आणि संवर्धन करण्यासाठी १९६६ मध्ये एक बृहत योजना सादर करण्यात आली ज्यात बुद्धगयेतील ३०० एकर जमीन ताब्यात घेऊन उत्क्खनन करण्यात येणार होते. त्यासाठी लागणाऱ्या सतरा लाख. रुपयांची तरतूदही करण्यात आली होती, मात्र ही योजना नंतर बासनात गुंडाळण्यात आली, त्याचे कारण मात्र कळले नाही. हा अधिनियम जरी पारित झाला तरीही बौद्धांमध्ये या अधिनियम आणि समितीबद्दल प्रचंड नाराजी होती. एक बौद्ध स्थान (जे पुरातत्त्वीय संशोधनातून सिद्ध झाले होते) व त्यावरची समिती हे बौद्धांच्याच हाती हवी होती.

१९९१ रोजी बिहारचे मुख्यमंत्री म्हणून लालूप्रसाद यादव यांची निवड झाली. महाबोधी महाविहाराबद्दल त्यांना आदर होता व बौद्धांचे मत योग्य आहे असे त्यांचे म्हणणे होते. १९९२ मध्ये ते "बोधगया महाविहार अधिनियम ११४९" या ऐवजी नवीन
"बोधगया महाबोधी महाविहार अधिनियम" आणू पाहत होते ज्यामुळे संपूर्ण बुद्धगया महाबोधी महाविहार परिसर व त्यावरची समितीवर फक्त बौद्धच असतील असे नमूद केले होते. हा अधिनियम पारित करुन घ्यायचा असा त्यांचा मानस होता. मात्र त्यावेळेस भारतीय जनता पार्टीने हिंदू कट्टरवाद्यांच्या साथीने याला प्रखर विरोध दर्शविला व हिंदुच्या अस्मितेचा प्रश्न उपस्थित केला.

भारतीय जनता पार्टीच्या कट्टरवादी आणि मुर्खपणामुळे बिहारचे राजकारण ढवळून निघाले आणि शांततेचे प्रतीक व बुद्धत्त्व प्राप्तीचे स्थान असलेले बौद्धगयेतील महाबोधी महाविहार परिसर एका घाणेरड्या राजकारणाच्यावेढ्यात अडकला.

जून २००२ मध्ये युनेस्कोच्या जागतिक वारसा समितीने महाबोधी महाविहाराला, जागतिक वारसा, म्हणून घोषित केले. युनेस्को म्हणते, "महाबोधी महाविहाराचा संबंध थेट तथागत बुद्धांच्या आयुष्याची निगडित आहे याच जागी त्यांना बुद्धत्त्व प्राप्त झाले व त्यांना मनुष्याच्या दुःख निवारण्याचा मार्गही सापडला. हे महाविहार विशेष महत्त्वाचे आहे कारण ते भारतीय उपखंडातील सर्वात प्राचीन बांधलेल्या वास्तु मधील एक आहे"

भारतीय राज्यघटना प्रत्येक व्यक्तीला विचार करणाने व ते मांडण्याचे तसेच व्यक्तिगत श्रद्धा अथवा धर्म धारण करण्याचे स्वातंत्र्य देते. म्हणजेच राज्यघटनेनुसार आम्ही धर्मनिरपेक्ष असल्यामुळे, प्रत्येक धर्माच्या बाबतीत आम्ही समतावादी आहोत् बोधगया महाविहाराची व त्याच्या परिसराची व त्याची स्थावर व जंगम मालमत्तेची योग्य राखण व्हावी यासाठी बिहार राज्याच्या विधिमंडळाने "बोधगया महाबोधी महाविहार कायदा" ६ जुलै १९४९ पासून अंमलात आणला. कोणत्याही कायद्याची प्रस्तावना ही खूप महत्त्वाची असते कारण संपूर्ण कायद्याची ती भूमिका असते. मात्र बोधगया महाबोधी महाविहार कायद्याच्या प्रस्तावनेत कुठेही बुद्ध, बौद्ध धम्म अथवा महाबोधी महाविहाराची ऐतिहासिक व सांस्कृतिक माहिती दिलेली नाही. तथागत बुद्धांचा अथवा या स्थळाचा उल्लेख नसणे हेच बिहार राज्याच्या त्याकाळच्या विधिमंडळाचे सर्व सदस्यांची "उच्च वर्ग" मानसिकता दिसते. तथागत बुद्ध आणि बुद्धधम्माच्या प्रति त्यांचा विरोध व तुच्छतेची वागणूक या कायद्यात पदोपदी दिसते.

या कायद्याच्या कलम क्र. ३ प्रमाणे व्यवस्था समितीमध्ये ९ सभासद असतील ज्याचे अध्यक्ष हे गया जिल्ह्याचे जिल्हाधिकारी असतील, चार बौद्ध असतील आणि चार हिंदू असतील ज्यात प्रामुख्याने बुद्धगया येथील महंत असतील. (वारसा परंपरेने ज्यांनी बुद्धगया महाविहारावर अनधिकृत कब्जा केला आहे). येथे हेही नमूद केले आहे कि महंत हा शैव पंथाचाच असला पाहिजे. त्याच बरोबर कलम ३ च्या उप कलम ३ नुसार या समितेचे अध्यक्ष हे हिंदूच असले पाहिजेत. जर तो हिंदू नसेल (म्हणजे गयाचे जिल्हाधिकारी) तर त्यांच्या जागेवर दुसऱ्या एखाद्या सरकारी हिंदू माणसाची निवड करावी. म्हणजेच कोणत्याही परिस्थितीत हिंदू सदस्य हे बौद्ध सदस्यांपेक्षा जास्तच असतील.

१३ ऑगस्ट २०१३ रोजी बिहार सरकार अचानक झोपेतून जागे झाले आणि त्यांच्या लक्षात आले की भारतीय राज्यघटना धर्मनिरपेक्षता मानते आणि प्रत्येक संस्था ही धर्मनिरपेक्ष असली पाहिजे आणि मग त्यांच्या लक्षात आले कि या कायद्यातील कलम ३ चे उप कलम ३ हे पूर्वग्रहदूषित असल्यामुळे ते तात्काळ हटविले पाहिजे व तसे करण्याचा एक वटहुकूम काढण्यात आला.

मूळातच बोधगया महाविहार कायदा हा पूर्वग्रहदूषित आहे. काही प्रसिद्ध मंदिरांची उदाहरणे आपण बघू यात - पुरी, ओडिशा येथील जगन्नाथ मंदिर कायदा १९५५ अपल्या प्रस्तावनेत स्पष्टपणे या मंदिराच्या थोर हिंदू परंपरेविषयी सांगतो. तसेच कलम ६ च्या उप कलम २ मध्ये नमूद केले आहे की या मंदिराचे सदस्य हे फक्त हिंदूच असतील! कलम ६ च्या उप कलम ३ मध्ये म्हटने आहे कि जर नेमलेले सरकारी अधिकारी बिगर हिंदू असतील तर त्यांच्या जागी सरकारने एखाद्या हिंदू अधिकाऱ्याची

नेमणूक करावी. कलम ७ च्या उप कलम १ नुसार या समितीचे अध्यक्षपद हे कायम पुरीच्या संस्थानिक असेल, मात्र जर संस्थानिक अल्पवयीन असेल किंवा विकलांग असेल तर त्यांच्या जागी फक्त हिंदूच अध्यक्ष घेण्यात यावा. म्हणजेच जगन्नाथ मंदिराचे सर्वच सदस्य हे फक्त हिंदूच असतील; इतर धर्माचे कोणीच नसावे. (अपवाद फक्त सरकारी नामांकित अधिकारी). आणखीन एक उदाहरण - राजस्थानातील श्री सांवरलियाजी मंदिर कायदा १९९२ मध्ये कलम ६ च्या उप कलम २ ( अ) आणि (ब) मध्ये स्पष्ट म्हटले आहे कि सरकारतर्फे जे आठ सदस्य या समितीत असतील त्यापैकी पाच सदस्य हे हिंदूच असले पाहिजे आणि तेही शक्यतो वैष्णव पंथाचे.

बोधगया महाविहार कायद्याच्या कलम १० मध्ये समितीची कर्त्यव्य; अंतर्गत उप कलम १(ड) प्रमाणे "समितीने महाविहारात पूजा अर्चना तसेच परिसरात पिंडदान करण्याची व्यवस्था करावी" असे नमूद केले आहे. बुद्धविचाराच्या एकदम विपरीत असे हे मत आहे कारण बौद्ध धम्म अशा अतार्किक आणि अंधविश्वासावर विश्वास ठेवत नाही. याचाच अर्थ हा कायदा बनविणाऱ्यानी जाणून बुजून हिंदू धर्माची मते बौद्ध विचारांवर लादली आणि बौद्धांच्याच अधिकृत जागेत आंनधिकृत प्रवेश करून तेथील वातावरण अबौद्ध म्हणजेच हिंदुकरण करण्याचा प्रयत्न करत आहेत.

बौद्धगया महाविहार कायद्याच्या कलम १३ प्रमाणे "शैव पंथाच्या महंताच्या स्थावर अथवा जंगम मालमत्तेवर समितीचा काडीचाही अधिकार असणार नाही. मात्र याच कायद्यातील कलम ८(१) आणि (२) नुसार समितीच्या परवानगीने बोधगया महाविहाराची जागा अथवा मालमत्ता हलविता येऊ शकेल अथवा भाड्याने देखील देता येईल. समिती हिंदुबहुल असल्याने बोधगयेतील सर्व मालमत्तेवर (खऱ्या अर्थाने बौद्धांची) हिंदूचा अधिकार असेल मात्र शैव महंताच्या मालमत्तेवर इतर कोणाचाच कोणताही अधिकार नसेल. किती अजब कायदा आहे बुद्धगयेतील महाबोधी महाविहाराचा!!!

भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २६ प्रमाणे सार्वजनिक सुव्यवस्था; नीतिमत्ता व आरोग्य यांस अधीन राहून, प्रत्येक धार्मिक संप्रदाय अथवा त्यांच्यापैकी कोणत्याही गटास धार्मिक किंवा धर्मादायी प्रयोजनांकरिता संस्थानांची स्थापना करून, त्या स्वखर्चाने चालविण्याचा; धार्मिक बाबींमध्ये आपल्या व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचा; जंगम व स्थावर मालमत्ता मालकीची असण्याचा व ती संपादन करण्याचा; आणि कायद्यानुसार अशा मालमत्तेचे प्रशासन करण्याचा हक्क असेल.

बोधगया महाविहार कायदा १९४९, भारतीय राज्यघटनेच्या तत्वावर आधारित आहे का? भारतातील इतर मंदिरांचा कायदा काय सांगतो?

१९९२ मध्य, भन्ते आर्य नागार्जुन सुरई ससाई आणि भन्ते आनंद महाथेरो यांनी; "अखिल भारतीय महाबोधी महाविहार कमिटी" मार्फत शांततेच्या मार्गाने आंदोलन सुरु केले. संपूर्ण जगातून त्यांना पाठिंबा मिळाला मात्र भारत सरकार आणि बिहार राज्यसरकार यांनी या आंदोलनाकडे डोळेझाक केली. जुलै २००२ मध्ये बौद्ध भिक्खू आणि अभ्यासक, भन्ते प्रज्ञाशील यांनी संयुक्त राष्ट्र संघाच्या उच्च आयुक्त मेरी रॉबिन्सन यांना पत्र लिहून विनंती केली की त्यांनी महाबोधी महाविहाराच्या प्रकरंणावर लक्ष घालावे. ३० मार्च २००५ रोजी, राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग यांनी स्पष्ट शब्दात सुनावले, "बोधगया महाविहार कायदा १९४९ हा भारतीय राज्यघटनेच्या २६ व्या अनुच्छेदच्या विरुद्ध असून, पुरेश्या न्यायिक पद्धतीने महाबोधी महाविहारावर सध्याची कमिटी बरखास्त करून, संपूर्ण परिसर आणि महाविहार फक्त बौद्ध लोकांची कमिटी बसविण्यात यावी. यटिप्पणीवर केंद्रीय सामाजिक न्याय मंत्रालयाने ढुंकूनही पहिले नाही.

भारतात किंवा जगात कुठेही, एका धर्माच्या लोकांना इतर धर्माच्या श्रद्धास्थानाच्या व्यवस्थापन समितीत हक्क किंवा स्थान नसते किंबहुना तसा नियमच केला जातो. मग महाबोधी महाविहार समितीत हट्टाने हिंदू धर्माचे लोक कसे काय हक्क सांगू शकतात्त?

एक उदाहरण घेऊ यात - पंढरपूर हे विठ्ठल रखुमाई चे एक प्रसिद्ध देवस्थान आहे, ज्यांना महाराष्ट्रातील आराध्य दैवत म्हणून मनाचे स्थान आहे. "पंढरपूर मंदिर कायदा १९७३" मधील प्रस्तावना स्पष्ट शब्दात सांगते – "हा कायदा खास वारसा हक्काने ज्यांना विशेष अधिकार बहाल झाले आहेत अशा देवस्थानातील मंत्री, पुजारी आणि इतर सेवक; ज्यांना इथले सेवांकरिता आमदनी मिळत होती; अशा सर्वांचे विशेष अधिकार रद्द करून, इथले व्यवस्थापन एका ट्रस्ट द्वारे संचालित करण्यात येत आहे"

आपल्या सर्वांनाच माहीत आहे की, पंढरपूर येथे बडवे, उत्पात, सेवाधारी, कोळी, बेणारी, डांगे, डिंगरे, दिवटे, हरदास, क्षेत्रोपाध्य, पुजारी आणि परिचारक यांची प्रचंड मनमानी चालू होती. वरकऱ्यांबरोबरच सामान्य भाविकांना यांचा प्रचंड त्रास सहन करावा लागत होता. देवस्थानातील सगळी आर्थिक व्यवस्था यांच्या ताब्यात होती व त्यामुळे हे अति गब्बर होऊन संपूर्ण देवस्थानावर सत्ता राबवित होते. पहाटेपासून ते रात्री पर्यंतचे सर्व सोपस्कार यांच्या हातात होते. १९७३चा कायदा स्पष्ट बजावतो – "वारसा हक्काने या सर्वांना मिळणारे सर्व उत्पन्न, दक्षिणा रद्द करण्यासाठी हा कायदा करण्यात येत आहे".

पंढरपूर देवस्थानच्या कायदा मधील कलम १२ प्रमाणे जी कमिटी तयार करण्यात येईल त्यात राज्यसरकार तर्फे ११ सभासद निवडण्यात येतील (चेअरमन, सचिव, खजिनदार आणि इतर आठ) आणि १ सभासद हा पंढरपूर नगरपालिकेचे अध्यक्षपदावरील व्यक्ती असेल. या कलमात नमूद केल्याप्रमाणे समितीचे चेअरमन आणि नगरपालिकेचे अध्यक्ष या समितीत निवड होण्यासाठी विठ्ठल आणि रखुमाईचे निस्सीम भक्त असले पाहिजे आणि त्यांनी तसे लिखित स्वरूपात प्रतिज्ञापत्र सादर केले पाहिजे.

कलम २२ (ह) मध्ये नमूद करण्यात आले आहे की – "जे सदस्य हिंदू नसतील त्यांचे सदस्त्व रद्द करण्यात येईल". याचाच अर्थ समितीतील सर्व सदस्य हे "फक हिंदूच" असतील.

पंढरपूर कायद्यातील कलम ३४ (१) नुसार, या देवस्थानाचे कार्यकारी अधिकारी हा सरकारी नोकरीतील व्यक्ती असेल आणि "जो हिंदू असून, विठ्ठल रखुमाईचा निस्सीम भक्त असेल" अश्या निवड झालेल्या व्यक्तीने तसे प्रतिज्ञापत्र देणे बंधनकारक असेल.

जर हिंदू धर्माच्या मंदिरातील समिती फक्त हिंदू धर्मातील व्यक्तींचीच असेल तर महाबोधी महाविहार समितीवर बुद्ध धम्माचीच व्यक्ती का असू नयेत? तिथे हिंदू धर्मातील व्यक्तींचे काय काम?

जर पंढरपूर मंदिराचा कायदा बदलून तेथील उत्पात, बडवेंना प्रतिबंध करण्यात येतो, तर मग बुद्धगया महाविहार कायदा बदलून तेथील हिंदू महंत वगैरे लोकांना बाहेर का काढू शकत नाही?

अहमदनगर जिल्ह्यातील नेवसा तालुक्यात असलेले शनी शिंगणापूर हे असेच एक हिंदूंचे श्रद्धास्थान आहे. सार्वजनिक संस्था असलेले हे संस्थान, २०१८ मध्ये शैंनेश्वर देवस्थान ट्रस्ट (शिंगणापूर) कायदा संमत झाला. या कायद्याच्या प्रस्तावनेत म्हटल्या प्रमाणे राज्य सरकारला वेळोवेळी या ट्रस्टच्या समितीच्या गैरकारभाराबद्दल अनेक तक्रारी आल्या. त्यामुळे राज्य सरकारला येथे आवश्यक वाटते की लवकरात लवकर एक विशेष कायदा करण्यात यावा आणि येथील सुव्यवस्थे साथी एक समिती स्थापन करण्यात यावी.

"कलम ५(२) प्रमाणे समितीमध्ये ११ सदस्य असतील ज्यात अध्यक्ष, उपाध्यक्ष, आणि खजीनदार हे राज्य सरकारने नियुक्त केलेले प्रतिनिधी असतील. कलम ८(१) (ब) नुसार "ज्या व्यक्तिला सभासद म्हणून घ्यायचे असेल, ती व्यक्ति नेवसाच्या शनैश्वर यांची परम भक्त असली पाहिजे आणि त्याने तसे प्रतिज्ञापत्रावर लिहून दिले पाहिजे. शिर्डीचे साईबाबा हे कोणाला माहीत नाहीत? २३ ऑगस्ट २००४ मध्ये साईबाबा संस्थान ट्रस्ट (शिर्डी) कायदा अस्तित्वात आला. कलाम ८(ब) मध्ये लिहिल्याप्रमाणे ज्या व्यक्तीला सदस्य म्हणून घ्यायचे असेल "ती व्यक्ति श्री साईबाबाची परम भक्त असली पाहिजे आणि त्याने तसे लिहून दिले पाहिजे."

कलम १३(२) मध्ये कार्यकारी अधिकारी बाबत म्हटले आहे, "कार्यकारी अधिकारी हे पदावर येणारी व्यक्ति ही सहाय्यक जिल्हाधिकारी पेक्षा कमी नसावी मात्र ती श्री साईबाबाची परम भक्त असलेली पाहिजे आणि तसे प्रतिज्ञापत्र दिले पाहिजे".

उत्तर प्रदेशातील श्री काशी विश्वनाथ मंदिर कायदा हा २८ जानेवरी १९८३ मध्ये अमलात आला. कलम ३प्रमाणे, "जी व्यक्ति हिंदू नसेल त्यांना कोणत्याही परिस्थितीत कार्यकारणी समिती सदस्य अथवा मुख्य कार्यकारी अधिकारी होता येणार नाही. एवढेच काय तर जी व्यक्ति हिंदू नसेल तर त्या व्यक्तीला या मंदिरात नोकरी देखील करता येणार नाही"! पुढे असे म्हटले

आहे की “जर एखादा सदस्य इथल्या कोणत्याही समितीचा सदस्य झाल्यानंतर जर त्याने हिंदू धर्माचा त्याग केला तर अश्या सदस्याला ताबडतोब राजीनामा द्यावा लागेल किंवा त्याचे सदस्यत्व रद्द करण्यात येईल.”

कलम ६(२) प्रमाणे समितीत १५सदस्य असतील आणि उप कलम (ल) प्रमाणे यापैकी ३ सदस्य हे हिंदू असतील जे हिंदू धर्माचे पंडित असतील. यांची नियुक्ती राज्य सरकारने करावी.

“कलम ६(३) प्रमाणे जर राज्य सरकार नामांकित अधिकारी हिंदू नसल्यामुळे येथे काम करू शकत नसेल, तर त्याच्या जागी त्याच्या खालोखाल जी व्यक्ति (हिंदू असणारी) असेल तिची निवड करावी.” भारतीय राज्यघटनेच्या परिच्छेद २५ ते २८ नुसार प्रत्येक व्यक्तीला त्याला इच्छा असलेला धर्म पाळण्याचा, त्याचे संवर्धन करण्याचा, त्यासाठी धन गोळा करण्याचा व धर्मानुसार व्यवस्थापन करण्याचा अधिकार आहे. वर दिलेल्या काही हिंदू मंदिरांची उदाहरणे पाहिल्यानंतर आपल्या लक्षात येईल की प्रत्येक संस्था आपल्या धर्माचीच व्यक्ति समितीमध्ये घेते. आपल्याच धर्माच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करते. जर या सर्व संस्था आपापला धर्म व त्याचे विचार टिकवून आहेत तर मग बौद्धगया येथील महाबोधी महाविहावर आजही हिंदू महंत काय करत आहेत? तेथे त्यांचे काय काम आहे?

जर शिर्डी किंवा शनी शिंगणापुराचा आणि पंढरपूरचा कायदा बदलू शकतो तर मग महाबोधी महाविहरचा कायदा कानाही बदलू शकत? यात काय अडचण आहे?

मी कुढल्याही धर्माविरुद्ध नाही, प्रत्येकाने आपापला धर्म पाळावा, त्यात वावगे काहीच नाही. मात्र जर कोणी माझ्या धर्माच्या अतिशय महत्वाच्या असलेल्या स्थानावर ठाण मांडून बसत असेल, तर मात्र मला राग निश्चितच येणार आणि ते स्वाभाविक आहे. हिंदू आणि बौद्ध धर्माची मते अगदी वेगळी आहेत, नव्हे एकमेकांच्या विरुद्ध आहेत. तरीही हिंदू महंत हट्टाने का बरे बौद्धगयाच्या महाविहार समितीत बसतात? विशेष म्हणजे ‘सार्क’ याला पाठींबा देते आणि सर्वजण मूकपणे हे का सहन करत आहो? गेल्या साठ वर्षात एकाही राजकीय नेत्याला (विशेषतः स्वतःला डॉ. बाबासाहेबांचे अनुयायी म्हणणारे) हे दिसले नाही का? की राजकीय स्वार्थापोटी मूग गिळून गप्प आहेत? आपला वारसा आपल्यालाच जपायला हवा.

मित्रांनो, वरील माहिती केवळ आपल्या सर्वांसाठीच दिली आहे. आता लढा द्यायचा तो बौद्धगया महाविहार पंड्यांपासून मुक्त करण्यासाठी आणि त्याजागी फक्त बौद्धाची कमिटी असेल या साठी. आपण ही माहिती सगळीकडे पोहचवावी ही विनंती.

****************************************समाप्त****************************************